# जूनपासून फ्रेंच, पोर्तुगीज अभ्यासक्रम

Anuradha.kadam
@timesgroup.com
Tweet :anuradhakadamMT

## शिवाजी विद्यापीठात फॉरेन लँग्वेज विभागातर्फे प्रस्ताव मंजुरीच्या टप्प्यात

मटा एज्युकेशन



कोल्हापूर : बदलत्या शिक्षणप्रवाहातील संधींची व्याप्ती लक्षात घेऊन येत्या शैक्षणिक वर्षापासून शिवाजी विद्यापीठात फ्रेंच व पोर्तुगीज या भाषांमध्ये पदविका व प्रमाणपत्र अभ्यासक्रम शिकण्याची संधी विद्यार्थ्यांना मिळणार आहे. यासाठी विद्यापीठातील परदेशी भाषा विभागाच्यावतीने अभ्यासक्रम रचनेबाबत सादर केलेला प्रस्ताव मंजुरीच्या अंतिम टप्प्यात आले.

शिवाजी विद्यापीठात १९७० पासून परदेशी भाषा विभाग कार्यरत आहे. सुरूवातीला केवळ रशियन भाषा विभाग या नावाने सुरू झालेल्या या विभागामध्ये सध्या रशियन, जापनीज व जर्मन या तीन भाषांमधून पदविका, पदवी, व प्रमाणपत्र अभ्यासक्रम शिकण्याची सुविधा आहे. बारावीनंतर व पदवीनंतर या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश देण्यात येतो.

या तीन अभ्यासक्रमांसाठी प्रत्येकी ५० विद्यार्थी क्षमता असून दरवर्षी किमान शंभर विद्यार्थी विभागातून शिकून बाहेर पडतात. गेल्या काही वर्षांपासून या विभागातर्फे फ्रेंच व पोर्तुगीज या भाषांमधून अभ्यासक्रम शिकण्याची संधी मिळावी अशी मागणी विद्यार्थ्यांकडून आली होती. मात्र या दोन्ही भाषा शिकवण्यासाठी सक्षम प्राध्यापक उपलब्ध नसल्यामुळे विभागाच्यावतीने यासंदर्भात निर्णय घेणे शक्य नव्हते. मात्र आता तज्ज्ञ प्राध्यापकही उपलब्ध आहेत. सध्या या विभागात परदेशी भाषेतील साडेचार हजार पुस्तकांसह सुसज्ज ग्रंथालय आहे.


सध्याच्या शिक्षणप्रवाहामध्ये अनेक कौशल्याधारीत अभ्यासक्रमांना महत्त्व आले आहे. पारंपरिक पदवी अभ्यासक्रमांची चौकट मोडून विद्यार्थी व्यावसायिक शिक्षणाकडे वळत आहेत. तसेच स्पर्धा परीक्षेकडेही विद्यार्थ्यांचा कल वाढला आहे. व्यावसायिक, कौशल्यविकास व स्पर्धा परीक्षेनंतर प्रशासकीय सेवेतील करिअरचा विचार करणाऱ्या विद्यार्थी परदेशी भाषा शिकण्याबाबत आग्रही आहेत. शिवाजी विद्यापीठाच्यावतीने करण्यात आलेल्या पुढील पाच वर्षांच्या बृहत आराखड्यात आंतरराष्ट्रीय सामंजस्य करारांवर भर देण्यात आला आहे. अशा कराराच्या माध्यमातून परदेशी विद्यापीठात शिकण्यासाठी परदेशी भाषा अवगत असलेल्या किंवा शिकत असलेल्या विद्यार्थ्यांना विपुल संधी मिळणार आहे.

### प्रस्तावात काय आहे?

फ्रेंच व पोर्तुगीज या दोन भाषा सध्या जागतिक स्तरावर नोकरी, व्यवसाय क्षेत्रात संधींची कवाडे खुली करणाऱ्या आहेत. राज्यशास्त्र व भाषा विषयक स्वारस्य असलेल्या विद्यार्थ्यांना या भाषेच्या ज्ञानामुळे संशोधन क्षेत्रात काम करण्याचे नवे दालन खुले होणार आहे. इतिहास या विषयातील तज्ज्ञांना सध्या जागतिक स्तरावर संशोधनासाठी प्रचंड वाव आहे. त्यांच्यासाठी पूरक म्हणून पोर्तुगीज ही भाषा शिकल्यास पुरातन वस्तू, वास्तू याबाबत जागतिक स्तरावर काम करण्यासाठी या भाषेचा उपयोग होऊ शकतो. फ्रेंच भाषेतही नोकरी व व्यवसायामध्ये माहिती व तंत्रज्ञान, बिझनेस ॲप्लिकेशन या क्षेत्रात संधी आहेत. त्यामुळे या दोन भाषामधील अभ्यासक्रमाचे वर्ग सुरू करण्यासाठी सादर करण्यात आलेल्या प्रस्तावात या मुद्द्यांवर भर देण्यात आला आहे.

### परदेशी भाषाज्ञानामुळे मिळणाऱ्या संधी

परदेशी भाषेचे शास्त्रशुद्ध ज्ञान अवगत केल्यास विद्यार्थ्यांना नोकरी व स्वतंत्र व्यवसाय या दोन्ही क्षेत्रात चांगल्या संधी आहेत. यामध्ये दोन टप्प्यात संधींचा विचार केला जात आहे. स्पर्धा परीक्षेनंतर प्रशासकीय सेवेत जाण्याची इच्छा असलेल्या विद्यार्थ्यांना संरक्षण, परदेशी राजदूत, परराष्ट्र मंत्रालय यासारख्या खात्यातील सेवेसाठी परदेशी भाषाज्ञानाचा चांगला उपयोग होऊ शकतो. सध्या परदेशातील नोकरीच्या संधीही विद्यार्थ्यांना खुणावत आहेत. यामध्ये दुभाषी, अनुवादन, परदेशी प्रसारमाध्यमे या क्षेत्रात फॉरेन लँग्वेजचा फायदा होतो. व्यावसायिक संधींमध्ये हॉटेल मॅनेजमेंट, फूड टेक्नॉलॉजी, टेक्स्टाइल, फॅशन इंडस्ट्री, पर्यटन या क्षेत्रात काम करण्यासाठी विद्यार्थांना मराठी,हिंदी व इंग्रजीसोबत अन्य परदेशी भाषा अवगत असेल तर हजारो संधी उपलब्ध आहेत.




**सध्या विद्यापीठातील रशियन, जापनीज व जर्मन या भाषेच्या अभ्यासक्रमांना विद्यार्थांचा चांगला प्रतिसाद आहे. मात्र भविष्यात फ्रेंच व पोर्तुगीज या भाषांमधील करिअरच्या संधी विस्तारणार असल्यामुळे या दोन भाषेतील अभ्यासक्रमांची रचना पूरक करण्यात आली आहे. या दोन्ही भाषेच्या अध्यापनासाठी प्राध्यापक उपलब्ध आहेत.**

– डॉ. मेघा पानसरे, विभागप्रमुख, परदेशी भाषा विभाग, शिवाजी विद्यापीठ



घटनेने दिलेल्या अनेक मूलभूत अधिकारांपैकी एक असलेला मतदानाचा अधिकार बजावणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. किंबहुना, सुज्ञ नागरिक म्हणून ही जबाबदारी आहे. देशाचे भवितव्य ही तरूणाई असते. युवा मतदारांनी भविष्याला आकार देणाऱ्या लोकशाहीला सुदृढ करण्यासाठी मतदान केले पाहिजे.

– डॉ. देवानंद शिंदे,
कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

# विद्यापीठाच्या परीक्षांना दोन दिवस सुट्टी

कोल्हापूर टाइम्स टीम

लोकसभा निवडणुकींतर्गत कोल्हापूर व हातकणंगले मतदारसंघात २३ एप्रिल रोजी होणाऱ्या मतदानाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षांना सुट्टी देण्यात आली आहे. २३ व २४ एप्रिल रोजी होणारी परीक्षा पुढे ढकलण्यात आली आहे.

या दिवशी होणाऱ्या विषयांची परीक्षा २३ व २४ मे रोजी घेण्यात येणार आहे. सध्या शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील परीक्षा सुरू आहेत. परीक्षांच्या तारखा निवडणूक जाहीर होण्यापूर्वीच नियोजित असल्यामुळे निवडणुकीच्या काळात परीक्षा बंद ठेवण्याचा निर्णय विद्यापीठ प्रशासनाने घेतला. त्यानुसार २२ ते २४ एप्रिल या कालावधीत होणारे नियोजित पेपर पुढे ढकलण्यात आल्याचे विद्यापीठातर्फे कळवण्यात आले आहे.

## बंदोबस्तातील पोलिसास डेंगी

कोल्हापूर : लोकसभा निवडणुकीच्या बंदोबस्तासाठी मध्यप्रदेशातून आलेला पोलिस कॉन्स्टेबल सुमित राजेंद्र विश्वकर्मा (वय २२) यांना डेंगीची लागण झाल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यांच्यावर सीपीआरमध्ये उपचार सुरू आहेत. विश्वकर्मा बंदोबस्तासाठी कार्यरत असून, त्यांना हातकणंगले येथील एका धर्मशाळेत राहण्याची व्यवस्था केली आहे. शनिवारी रात्री त्यांची तब्येत बिघडली. त्यांच्या रक्ताचे नमुने घेतले असताना त्यांना डेंगीचे झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले.

सकाळ

# विद्यापीठातील बाग होणार झकास

उजळाईवाडी, ता. २२ : शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर असणाऱ्या बागेचे सुशोभीकरणाचे काम प्रशासनाने हाती घेतले आहे. यामध्ये कट्ट्याचे काम, फरशा बदलणे याबरोबरच दगडी कठडा करण्यात येणार आहे, अशी माहिती शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव विलास नांदवडेकर यांनी दिली. याबाबतच्या आवश्यक त्या सर्व परवानग्या घेण्यात आल्या असून लवकरच हे काम पूर्ण होईल. तसेच या बगीच्यातील फुलांची झाडे, लॉन, येण्याचे मार्ग यांचीही पुनर्रचना करण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या आवारात असणारा छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा ही शिवाजी विद्यापीठाची ओळख आहे. हा भव्य पुतळा विद्यापीठाच्या परिसराची शोभा वाढवतो.

पुतळ्याभोवती असणारी बागही आकर्षक आहे. मात्र, सध्या या बागेभोवतीचा कठडा काही ठिकाणी ढासळला आहे. त्यामुळे या बागेचे सुशोभीकरण करण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने आराखडा बनवला असून प्रत्यक्ष कामालाही सुरूवात झाली आहे. सुशोभीकरणामध्ये बागेभोवती दगडी कट्टा बनवण्यात येणार आहे. हा कट्टा घडवलेल्या काळ्या दगडांचा असल्याने अश्वारूढ पुतळ्याची शोभा वाढेल. तसेच बागेमध्ये काही विशिष्ट प्रकारचे वृक्ष लावण्यात येणार आहेत. यामुळे इथे नैसर्गिक गारवा निर्माण होईल. वेगवेगळ्या प्रकारची फुलझाडेही सुशोभीकरणाच्या अंतर्गत बागेत लावली जातील. बागेच्या परिसरातील फरशा बदलण्याचेही काम या सुशोभीकरणात होणार आहे.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोरील बागेचे सुशोभीकरण करण्याचे काम सुरू आहे.**

> “ शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीसमोर असलेल्या उद्यानामुळे या परिसराची शोभा वाढली आहे. शिवाजी महाराजांचा अश्वारुढ पुतळा हा वैशिष्ट्यपूर्ण आहे. या पुतळ्याला साजेशी बागेची रचना सुशोभीकरणात केली असून लवकरच हे काम पूर्णत्वास जाईल.
> सुशोभीकरणासाठी राष्ट्रीय उच्च शिक्षण अभियानअंतर्गत निधी उपलब्ध झाला असून दोन दिवसांपासून कामाला सुरुवात झाली आहे.
> - डॉ. विलास नांदवडेकर, कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ.

Kolhapur, Kolhapur-Today
23/04/2019 Page No. 7

सकाळ

# विद्यापीठ परीक्षेचे आजचे पेपर पुढे ढकलले

कोल्हापूर : मतदानाच्या कारणामुळे शिवाजी विद्यापीठाचे आजचे (ता. २३) दिवशीचे पेपर पुढे ढकलले आहेत. आतापर्यंत विविध अभ्यासक्रमांच्या ५० परीक्षा पूर्ण झाल्या आहेत. जून महिन्यापर्यंत या परीक्षा सुरू राहतील. विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या उन्हाळी परीक्षा एप्रिल, मे, जून या तीन महिन्यांत होतात. यंदा निवडणुकीमुळे मतदानादिवशीचे पेपर पुढे ढकलले आहेत. त्यामुळे काही अभ्यासक्रमांच्या परीक्षांचा कालावधी वाढला आहे. या परीक्षा जून महिन्यापर्यंत सुरू राहणार आहेत. मात्र या परीक्षांचा निकाल कमी कालावधीत लावून, पुढील वर्षीचे प्रवेश निश्चित कालावधीत होतील, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

Kolhapur, Kolhapur-Today
23/04/2019 Page No. 8

सकाळ

» आठवड्याची मुलाखत

# ग्रंथालयांनी आधुनिक होण्याची गरज : डॉ. नमिता खोत

नंदिनी नरेवाडी



पूर्वीच्या काळी वाचक वाचनाचा छंद जोपासण्यासाठी ग्रंथालयात जात होते; पण सध्या वाचक 'ई' फॉर्ममधील पुस्तके वाचण्यावर भर देत असल्याने ग्रंथालयांनीच या आधुनिक काळात बदल घडवून वाचकांपर्यंत पोहोचण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, असे मत शिवाजी विद्यापीठाच्या ज्ञानस्रोत केंद्राच्या संचालिका डॉ. नमिता खोत यांनी व्यक्त केले. प्रख्यात इंग्रजी नाटककार विल्यम शेक्सपिअरचा जन्मदिन आणि मृत्युदिन म्हणजेच २३ एप्रिल हा दिवस 'जागतिक पुस्तक दिन' म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने त्यांच्याशी साधलेला संवाद...

वाचन चळवळीच्या संवर्धनासाठी त्या सांगतात, ''सध्या सोशल मीडियाच्या जमान्यात पुस्तकांकडे ओढा कमी झाला असला तरी वाचक ई फॉर्ममधील पुस्तके मोठ्या प्रमाणात वाचतात. कोणतीही माहिती हवी असल्यास ई फॉर्ममधील स्रोत तपासले जातात. म्हणजेच ई बुक्स, ई जर्नल्स, ई डेटाबेस या ऑनलाईन व सहज उपलब्ध होणाऱ्या माहितीकडे वाचक वळतात. त्यामुळे ग्रंथालयात एखादे पुस्तक चाळून त्यातून संदर्भ घेण्याची पद्धत आता बंद होऊ लागली आहे. पुस्तके वाचविण्यासाठीची मोठी जबाबदारी ग्रंथपालांवर आहे हे सांगताना त्या म्हणाल्या, ''अजूनही जुन्या पिढीतील लोकांना हातात पुस्तके घेऊन निवांत वाचायला आवडते. अशा पद्धतीने पुस्तके वाचतानाचा जो आनंद असतो तो नव्या पिढीला माहीत नाही. त्यांना तो कळावा यासाठी ग्रंथालयांनी काही उपक्रम हाती घेणे गरजेचे वाटते. शाळा, कॉलेजमध्ये बेस्ट रीडर असा पुरस्कार सुरू केला, वाचनकट्टासारखी चळवळ उभी राहिली तर नक्कीच याला यश येईल.'' त्या सांगतात, ''मराठी वाचनसंस्कृती टिकविण्यासाठी पालकांनी पुढाकार घेणे गरजेचे आहे. लहान मूल रडत असताना त्याला मोबाईल ऐवजी त्याला मातृभाषेतील पुस्तकातील एखादी गोष्ट रंजक पद्धतीने सांगता आली तर त्याला वाचण्याची गोडी लागेल. पुस्तकांशिवाय मोठा गुरू कोणीही नाही. त्यामुळे पुस्तकांचे महत्त्व युवा पिढीला कळावे, यासाठी अधिक प्रयत्न व्हायला हवेत.'' व्यक्ती सुजाण, सृजनशील, सजग, साहित्यप्रेमी होण्याबरोबरच त्याचा वैचारिक विकास कसा होईल, हे युवा पिढीला पटवून देऊ शकलो तरच युवा पिढी वाचनसंस्कृतीकडे वळेल, असा आशावादही त्यांनी व्यक्त केला.

> इंग्रजी पुस्तके ई फॉर्ममध्ये ऑनलाईन उपलब्ध आहेत. मराठी पुस्तकेही अशा पद्धतीने ई फॉर्ममध्ये उपलब्ध झाली तर वाचकसंख्या निश्चितच वाढेल. अशा वेळी ग्रंथालयांनीच आधुनिक युगाचा स्वीकार करत 'ई' फॉर्ममध्ये वाचकांपर्यंत कसे पोहचता येईल, यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे.
> – डॉ. नमिता खोत

23 APR 2019

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील शिवाजी पुतळ्याचे सुशोभीकरण

## 'रुसा' अंतर्गत ५० लाखांचा निधी : विद्यापीठाच्या सौंदर्यात आणखी भर पडणार

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात शिवाजी पुतळ्याची स्थापना सात कारखान्यांच्या देणगीतून १९७४ मध्ये केली. हा पुतळा बांधण्यापूर्वी परिसराचे सुशोभिकरण करण्यात आले होते. आता तब्बल ४३ वर्षानंतर राष्ट्रीय उच्चस्तर शिक्षा अभियान (रुसा)अंतर्गत ५० लाख रुपयांचा निधी खर्च करून, शिवाजी पुतळा परिसराचा चेहरा-मोहरा बदलण्याचे काम सुरु आहे. संरक्षण कठड्याला बाहेरून दगडाचे आवरण व आतमध्ये फरश्या बसवल्या जाणार आहेत.

शिवाजी विद्यापीठ परिसरातील पुतळा परिसर व संरक्षण कठड्याच्या फरशा खराब झाल्या आहेत. म्हणून विद्यापीठ प्रशासनाने पुतळा परिसराचे रुपडेच बदलून टाकण्याचा निर्णय घेतला आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील शिवाजी पुतळ्याचे सुशोभिकरणाच्या कामाला प्रारंभ.

गेल्या आठवड्यापासून संरक्षण कठडा बांधकाम सुरु आहे. फुलझाडांसह शोभी काही झाडेही लावली जाणार आहेत. त्यामुळे विद्यापीठाच्या सौंदर्यात आणखी भर पडणार आहे. विद्यापीठ अधिकार मंडळ, पर्यावरण समितीसह आवश्यक परवानगी घेऊन, बांधकाम सुरु केले आहे. विद्यापीठातील इंजिनिअरिंग विभाग हे काम पाहत आहे. या सुशोभीकरणामुळे पर्यटकांचा ओढा वाढणार आहे.

**सहा महिन्यात काम पूर्ण होणार**

सुशोभीकरणाचे बांधकाम पूर्ण होण्यासाठी सहा महिन्याचा कालावधी लागणार आहे. दोन भागात काम पूर्ण केले जाणार आहे. या सुशोभिकरणामुळे पुतळा परिसराची शोभा वाढणार आहे. पावसाळ्यात येथे चिखलही होणार नाही. त्यामुळे हे बांधकाम अतिशय देखणे करण्याचा प्रयत्न सुरु आहे.

-डॉ. विलास नांदवडेकर
कुलसचिव